आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२० सप्टेंबर २०२५ - शनिवार

**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते देशातल्या सर्वात मोठ्या मुंबई क्रुझ टर्मिनलचं लोकार्पण

- अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांसाठी मंजूर झालेला निधी पुढच्या आठवड्यापासून बँक खात्यात जमा होणार

- एसटी महामंडळात कंत्राटी तत्त्वावर साडे १७ हजार चालक आणि सहाय्यकांची भरती होणार

- बुलेट ट्रेनचा पहिला टप्पा २ वर्षात सुरू होणार असल्याची रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची घोषणा

**आणि**

- महिला क्रिकेटमध्ये भारताविरुद्धच्या एकदिवसीय सामन्यात ऑस्ट्रेलियाकडून ४१२ धावांचा डोंगर

**<><><><>**

स्वातंत्र्यप्राप्तीच्या शतकपूर्तीपर्यंत म्हणजे २०४७पर्यंत विकसित व्हायचे असेल तर भारताला आत्मनिर्भर होण्याशिवाय पर्याय नाही, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. गुजरातमधल्या भावनगरमध्ये समुद्र से समृद्धी तक या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी त्यांनी 32 हजार कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पांची पायाभरणी आणि लोकार्पण केलं. त्यात मुंबईतल्या आंतरराष्ट्रीय क्रूज टर्मिनलच्या उद्घाटनाचाही समावेश आहे. अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

- **- होल्ड - कॅप्सूल - -**

*(देशासमोर असलेल्या अनेक समस्यांचं उत्तर स्वयंपूर्ण होण्यात असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं.*

*HOLD BYTE - 1415-PM-MODI-ATMNIRBHAR.mp3*

*भारताच्या ऐतिहासिक सागरी बळाचा उल्लेख करत प्रधानमंत्र्यांनी जगातला 40 ते पन्नास टक्के व्यापार भारतात तयार झालेल्या जहाजांवरुन होत होतं. ही परंपरा पुढे चालवण्यासाठी भारताचं सागरी क्षेत्र कसून काम करत आहे असं ते म्हणाले. देशातल्या सर्व बंदरांवर एकसारख्या पद्धतीनं कामं व्हावीत यासाठी सर्व प्रक्रियांचं सुलभीकरण सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली. संसदेत बंदरांसंबंधी ५ विधेयकं नुकतीच मंजूर झाली असून यातून या क्षेत्रात आमुलाग्र बदल घडणार असल्याचं ते म्हणाले.*

*प्रधानमंत्र्यांनी आज मुंबईतल्या बॅलार्ड पियर भागातल्या आंतरराष्ट्रीय क्रुझ टर्मिनलचं उद्घाटन केलं. सव्वा ४ लाख वर्गफूट क्षेत्रफळावरं उभं राहिलेलं हे देशातलं सर्वात मोठं क्रुझ टर्मिनल आहे. वर्षाला १० लाखांहून अधिक प्रवासी आणि एकाचवेळी ५ क्रुझ इथं उभ्या राहू शकतात. यावेळी ६६ हजार कोटी रुपयांचे २१ सामंजस्य करार झाले. त्यात महाराष्ट्रात मोठं जहाज बांधणी केंद्र उभारण्याच्या कराराचा समावेश आहे. मुंबई पोर्ट ट्रस्ट आणि महाराष्ट्र मेरीटाइम बोर्डात हा करार झाला.*

*प्रधानमंत्र्यांनी अहमदाबादजवळच्या लोथल इथेही भेट दिली आणि तिथे सुरु असलेल्या राष्ट्रीय सागरी वारसा संकुलाला भेट दिली. लोथल हे सिंधु संस्कृतीच्या काळातल्या भारताचं व्यापारी केंद्र होतं. भारताची सागरी परंपरा प्रदर्शित करण्यासाठी इथे साडेचार हजार कोटी रुपयांच्या खर्च करुन हे संकुल उभारण्यात येत आहे. कच्छमधे धोरडो हे गाव पूर्णपणे सौर ऊर्जेचा वापर करीत असून त्याचं लोकार्पण प्रधानमंत्र्यांनी केलं. गुजरातमधे यापूर्वी मोढेरा, सुखी आणि मसाली या गावामधेही पूर्णपणे केवळ सौर ऊर्जेचा वापर होतो.)*

**<><><><>**

मल्याळी जेष्ठ अभिनेते मोहनलाल यांना 2023 या वर्षाचा दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर झाला आहे. दादासाहेब फाळके पुरस्कार निवड समितीच्या शिफारशीवरुन केंद्र सरकारने हा पुरस्कार जाहीर केला आहे.

प्रख्यात अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माते असणाऱ्या मोहनलाल यांची कारकिर्द अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायक आहे. परवा म्हणजे २३सप्टेंबरला ७१व्या राष्ट्रीय फिल्म पुरस्कार समारंभात त्यांना फाळके पुरस्काराने गौरवण्यात येईल.

**<><><><>**

अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांसाठी मंजूर झालेला निधी पुढच्या आठवड्यापासून खात्यात जमा होईल, असं कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितलं. वाशिममध्ये पाहणी दौऱ्याच्या दरम्यान त्यांनी ही माहिती दिली.

- **- होल्ड बाईट भरणे** - -

नांदेड, वाशिम, यवतमाळ, बीड, सोलापूर, धाराशिव, बुलढाणा, अहिल्यानगर, जालना, अकोला, हिंगोली, अमरावती, वर्धा, परभणी, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, पुणे, नंदुरबार, रत्नागिरी, रायगडसह ३० जिल्ह्यांना अतिवृष्टीचा फटका बसला आहे. या अतिवृष्टीमध्ये खरीप हंगामातील जिरायती, बागायती आणि फळ पिकांना फटका बसला आहे. सोयाबीन, मका, कापूस, उडीद, तूर, मूग, बाजरी, ऊस, कांदा आणि ज्वारी या पिकांचं नुकसान जास्त आहे. तसंच काही ठिकाणी भाजीपाला, फळ पिकं आणि हळद या पिकांचंही नुकसान झालं आहे.

दरम्यान, अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी हिंगोलीत आलेल्या कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या गाड्यांचा ताफा अडवत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या त्यांना काळे झेंडे दाखवले. राज्यात ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी आंदोलकांनी केली.

**<><><><>**

अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना नुकसानीपोटी मदत देण्यासाठी ६८९ कोटी ५२ लाख ६१ हजार रुपयांच्या निधीला सरकारने मान्यता दिली आहे. नांदेड, परभणी, सातारा आणि सांगली जिल्ह्यातल्या शेतकऱ्यांना या निधीचं वाटप होईल, अशी माहिती मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिली.

नांदेड जिल्ह्यात सुमारे साडे ६ लाख हेक्टर क्षेत्रावरील पिकाचं नुकसान झालं आहे. यासाठी ५५३ कोटी रुपयांहून अधिक मदत दिली जाणार आहे. परभणी जिल्ह्यातल्या बाधित शेतकऱ्यांसाठी १२८ कोटी रुपयांहून अधिक, सांगली जिल्ह्यातल्या बाधित शेतकऱ्यांसाठी सुमारे साडे ७ कोटी आणि सातारा जिल्ह्यातल्या शेतकऱ्यांसाठी ४ लाख ६२ हजार रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे. मदतीचा निधी शेतकऱ्यांच्या कर्ज अथवा अन्य वसुलीत वळती करू नये यासाठी संबधित जिल्हाधिकाऱ्यांनी बँकांना निर्देश द्यावेत, अशा सूचना मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिल्या आहेत.

**<><><><>**

एसटी महामंडळात चालक आणि सहाय्यकांची १७ हजार ४५० कंत्राटी पदे भरली जाणार असल्याची घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली. येत्या २

ऑक्टोबरपासून या भरतीसाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. ही भरती ३ वर्षं कालावधीसाठी असेल. ३० हजार रुपये इतकं किमान वेतन या चालक, सहाय्यकांना मिळणार आहे. तसंच त्यांना एसटीकडून प्रशिक्षण देखील दिलं जाईल. तरुण -तरुणींनी या संधीचा पुरेपूर लाभ घ्यावा, असं आवाहन सरनाईक यांनी केलं.

**<><><><>**

कायदा आणि सुव्यवस्थेचे पालन करताना अमली पदार्थ संदर्भातील गुन्हे हे पोलीस दलासमोर आव्हान ठरत आहे. त्यासाठी राज्याने झीरो टॉलरन्स धोरण अवलंबलं आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. इंडियन पोलीस फाऊंडेशनच्या १० व्या स्थापना दिनानिमित्त मुंबईत आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

**<><><><>**

नौदलाच्या पश्चिम विभागाचे प्रमुख व्हाईस ॲडमिरल कृष्ण स्वामिनाथन यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. पश्चिम किनारपट्टीवरच्या संरक्षण व्यवस्थेबद्दल त्यांनी मुख्यमंत्र्यांना माहिती दिली.

लष्कराच्या महाराष्ट्र, गुजरात आणि गोवा क्षेत्राचे मुख्याधिकारी लेफ्टनंट जनरल डी एस कुशवाहा यांनीही आज मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. युद्धेतर काळात लष्कराने राबवलेल्या बचाव आणि मदतकार्याबद्दलची तसंच  ज्येष्ठ नागरिक तसंच महिलांच्या सुरक्षा आणि कल्याणासाठी राबवलेल्या उपक्रमांची माहिती त्यांनी मुख्यमंत्र्यांना दिली.

**<><><><>**

महत्त्वाकांक्षी अहमदाबाद-मुंबई बुलेट ट्रेनचा सूरत ते बिलमोरा हा पहिला टप्पा २०२७ मध्ये सुरू होईल, अशी माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज दिली. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

- ***- होल्ड - कॅप्सूल - -***

*(बुलेट ट्रेन मार्गावरच्या घणसोली ते शीळफाटा यादरम्यानच्या ५ किलोमीटरच्या बोगद्याचं जोडकाम केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या उपस्थितीत आज पूर्ण झालं. बीकेसी ते शीळफाटा या समुद्राखालून जाणाऱ्या २१ किलोमीटर बोगद्यापैकी ७ किलोमीटरचा भाग ठाण्याच्या खाडीखालून जातो. या प्रकल्पाचा ठाण्यापर्यंतचा टप्पा*

*२०२८ पर्यंत, तर वांद्रे-कुर्ला संकुलापर्यंतचा भाग त्याच्यापुढच्या वर्षी पूर्ण होईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या प्रगतीबद्दल रेल्वेमंत्री म्हणाले….*

***होल्ड… बाईट- वैष्णव***

*ही बुलेट ट्रेन पूर्ण झाल्यानंतर अहमदाबाद ते मुंबई प्रवासाचा वेळ सुमारे सव्वा २ तासांवर येईल. यामुळं या मार्गावरची महत्त्वाची आर्थिक केंद्रं असलेली शहरं एकमेकांशी जोडली जाऊन यातून व्यापक हित साधता येईल, असा विश्वास वैष्णव यांनी व्यक्त केला.*

*मुंबईत यापुढे येणाऱ्या सर्व लोकलचे दरवाजे स्वयंचलित असतील, असं त्यांनी स्पष्ट केलं.*

***होल्ड… बाईट- अश्विनी वैष्णव***

सध्या मुंबईत धावणाऱ्या साध्या लोकललाही स्वयंचलित दरवाजे लावले जाणार आहेत, असंही ते म्हणाले.

***आकाशवाणी बातम्यांसाठी अंकिता आपटे, घणसोली, नवी मुंबई)***

**<><><><>**

वस्तू आणि सेवा करातले बदल देशातल्या नागरिकांना फायद्याचे ठरावे म्हणून केले आहेत असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सांगितलं. कर पुनर्रचनेत ३७५ वस्तूं आणि सेवांवरचा  कर कमी झाला आहे, अशी माहिती त्यांनी दिली. जीएसटी संदर्भातल्या इतर बातम्या ऐकूया आमच्या प्रतिनिधीकडून….

- **- -होल्ड- व्हॉईस कास्ट-**

*(जीएसटीच्या दरांमध्ये केलेल्या कपातीच्या अंमलबजावणीत काही अडचणी आल्या तर ग्राहकांना १९१५ या क्रमांकावर देशातल्या १७ विविध भाषांमधे तक्रार नोंदवण्याची सुविधा उपलब्ध आहे. वाहनं, बँकिंग, ई कॉमर्स, ग्राहकोपयोगी वस्तू आणि उपकरणं अशा विविध वस्तूंवरच्या कर आकारणीसंदर्भातल्या तक्रारी या मदत क्रमांकावर नोंदवता येतील.*

*जीएसटी करपुनर्चनेचा फायदा ग्राहकांपर्यंत पोहचवण्याच्या उद्देशाने रेल्वेने बाटलीबंद पाण्याच्या कमाल विक्री दरात कपात करायचं ठरवलं आहे. त्यानुसार येत्या सोमवारपासून रेलनीरची एक लीटरची बाटली १५ ऐवजी १४ रुपयांना तर अर्धा लीटरची बाटली १० ऐवजी ९ रुपयांना मिळेल.*

*या नवीन कररचनेत घरगुती इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या किमतीत अनेक बदल झाले आहेत. दूरचित्रवाणी संच, एअर कंडिशनर, डिशवॉशर यांसारख्या वस्तुंवरचा कर २८ टक्क्यांवरून १८ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आला आहे. या सुधारणांमुळे उपकरणांची मागणी वाढून देशांतर्गत उत्पादकांना बाजारपेठेत वाव मिळेल. तसंच, या उपकरणांसाठी लागणाऱ्या वायरिंग, कूलिंग सिस्टम, एलईडी पॅनेलचे पुरवठादार आणि सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांसाठी देखील ही नवी कररचना लाभदायक ठरणार आहे.)*

**<><><><>**

नवरात्री दरम्यान कोल्हापूरच्या आई अंबाबाईच्या मंदीरात होणारी गर्दी लक्षात घेऊन कोल्हापूर जिल्हाप्रशासनाने जय्यत तयारी केली आहे. गर्दीच्या व्यवस्थापनाचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी मंदिर परिसराला भेट दिली. आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने अतिक्रमणे हटवण्यात आली आहेत तसंच परिसरातले काही स्टॉलही दहा दिवसांसाठी हटविण्यात येणार आहेत. वाहनतळांची सोय करण्यात आली आहे तसंच वाहनतळापासून मंदिरापर्यंत वाहनव्यवस्था करण्यात आलेली आहे. स्वच्छतागृह आणि पाण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे अशी माहिती कोल्हापूरच्या महापालिका आयुक्तांनी यावेळी दिली.

**<><><><>**

भारत जागतिक आव्हानांचा सामना करत अमृतकाळात एकेक पाऊल पुढे जात आहे. यासाठी शिक्षण, नैतिक मूल्यांचे आचरण करत एकसंध काम करत योगदान देण्याचं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे प्रधान सचिव डॉ. पी. के. मिश्रा यांनी विद्यार्थ्यांना केलं. आयआयएम मुंबईच्या दुसऱ्या दीक्षांत समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. भारताच्या भविष्याला आकार देण्यात आयआयएमसारख्या व्यवस्थापन संस्थांची महत्त्वाची भूमिका असल्याचं त्यांनी सांगितलं. आयआयएमच्या माजी विद्यार्थ्यांचा देशाच्या उद्योग आणि अर्थ क्षेत्रात मोलाचा हातभार असल्याचंही ते म्हणाले.

**<><><><>**

वाशिमकडून अमरावतीकडे निघालेल्या एसटी बसला वाशिमहून जवळच कळंबा महाली इथं सकाळी अपघात झाला. यात सात प्रवासी जखमी झाले. बसमध्ये मानोरा तालुक्यातल्या असोला इथले भाविक पंढरपूरवरून भागवत सप्ताह आटोपून परतत होते.

**<><><><>**

एकदिवसीय महिला क्रिकेट मालिकेतल्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाने भारतासमोर ४१३ धावांचं आव्हान ठेवलं आहे. ऑस्ट्रेलियाची कर्णधार एलिसा हिलीने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. कर्णधाराचा निर्णय सार्थ ठरवत ऑस्ट्रेलियन खेळाडूंनी शानदार प्रदर्शन करत ४८ व्या षटकात सर्वबाद ४१२ धावांची खेळी केली. बेथ मुनीनं १३८ धावांची शतकी खेळी करत तर जॉर्जिया वोल हिनं ८१ धावा करत ऑस्ट्रेलियन संघाला मजबूत धावसंख्या उभारून दिली. भारताकडून अरुंधती रेड्डीने तीन तर रेणुका सिंगने आणि दिप्ती शर्माने प्रत्येकी दोन बळी घेतले.

भारताच्या खेळाची सुरुवात खराब झाली. ८५ धावांच्या आता भारताच्या २ खेळाडू तंबूत परतल्या. मात्र सलामीवीर स्मृती मंधना खेळपट्टीवर टिकून आहे. तिनं नाबाद शतक केलं आहे. कर्णधार हरमन प्रीत कौर नाबाद अर्धशतकावर खेळते आहे.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या २० षटकात दोन बाद २०४ धावा झाल्या होत्या.

स्तनांच्या कर्करोगाबद्दल जनजागृतीसाठी भारतीय खेळाडू आज गुलाबी जर्सी परिधान करून खेळत आहेत.

**<><><><>**

चायना मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या सात्विकसाईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीनं पुरुष दुहेरीच्या अंतिम फेरीत धडक मारली. उपांत्य फेरीत त्यांनी मलेशियाच्या जोडीवर २१-१७, २१-१४ अशी सहज मात केली.

**<><><><>**

राज्यात गेल्या २४ तासांत मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडला. कोकण आणि मराठवाड्यात बऱ्याच ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी, तर विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस झाला. उद्या कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. तर तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**//<><><><>//**